| | |
|---|---|
| MHAH060026652024 | **<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६१४/२०२४ मध्ये निशाणी क्र.१३ वरील आदेश</u>**<br>**(जयश्री प्रमोद मुन्तोडे वि. प्रमोद प्रभाकर मुन्तोडे)** |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कायदा २००५ (यापुढे 'घरगुती हिंसाचार कायदा २००५' संक्षिप्तरित्या संबोधले जाईल) अंतर्गत कलम २३ अन्वये प्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जदारांचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे मांडण्यात येत आहे.</u>**

**०२.** अर्जदार व सामनेवाले क्र. १ पती पत्नी असुन यांचेत नातेसंबंध आजही कायम आहे. सामनेवाला क्र.१ पासुन अर्जदार हीस दोन अपत्य झालेले आहेत. अर्जदार सामनेवालाकडे नांदत असताना सामनेवाला व कुटुंबीयांनी पैशाचे मागणी वरुन तसेच सामनेवाला क्र. १ व्यसनी असल्याने तिचा वैयक्तीक व संयुक्तीकरित्या तसेच मारहाण व शिवीगाळ करुन तिला उपाशी ठेवणे, कष्टाची कामे करुन घेणे, टोमणे मारणे अशा प्रकारे शारिरीक व मानसिक छळ केला. सामनेवाला क्र. १ ने अर्जदाराचे डोक्यात जबर प्रहार केल्यामुळे तिच्या डोक्यात टाके पडले होते.

**०३.** दिनांक १३.०२.२०२४ रोजी सामनेवाले यांनी अर्जदार हीस वैयक्तीक व संयुक्तीकरित्या मारहाण, शिवीगाळ करुन एका वस्त्रानिशी हाकलुन दिले व अनेक प्रयत्न करुनही नांदविले नाही म्हणुन सामनेवाले विरुध्द सदरचा अर्ज दाखल केला. अर्जदार हीस फत्याबात, ता. श्रीरामपूर येथुन न्यायालयात यावे लागत असलयाने तसेच अर्जदाराला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने सर्व खर्च करणे अशक्य आहे.

**०४.** सामनेवालाची बागायती शेती असल्याने त्यात सामनेवाला बागायती पिके घेतो, तसेच ट्रॅक्टर आहे, दुध दुभत्याचा व्यवसाय आहे. या सर्वांपासुन सामनेवाला हिस महिनाकाठी सुमारे दीड लाखाचे उत्पन्न मिळते. सामनेवालाची आर्थिक ऐपत असुन कायदेशीर जबाबदारी आहे. सामनेवालेंकडुन अर्जदार हीस तुर्तातुर्त पोटगी दरमहा २५,०००/– रक्कम रुपयांची मागणी केली आहे.

**सामनेवाला क्र. १, २, ३, ५ यांचे म्हणणे –**

**०५.** सामनेवाला क्र. १,२,३,५ यांनी निशाणी क्र. १० वर त्यांचे म्हणणे दाखल केले असुन त्यात त्यांनी अर्जदाराचा अर्ज खरा व कायदेशीर नसलेबाबत व तो त्यांना मान्य व कबुल नसल्याबाबत कथन केले आहे. तसेच सदरचा अर्ज दाखल करणेस अर्जदारास कोणतेही कारण घडलेले नसल्याबाबत सबब अर्जदाराचा अर्ज रद्द करणेस पात्र असल्याबाबत कथन केले. अर्जदाराचा व सामनेवाला नं.१ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्र रिवाजा प्रमाणे झालेला असलेबाबत त्यांनी मान्य केलेले आहे. विवाह मोठया थाटामाटात सामनेवालांचे मागणीप्रमाणे हुंडा देवुन संपन्न झाले बाबत त्यांना मान्य व कबुल नाही.

**०६.** लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाला नं.१ याचेकडे नांदणेस आली व त्यानंतर अर्जदार ही सुरुवातीचे एक त दिड वर्षे माहेरी जावुन येवुन कशीबशी नांदली. अर्जदार किरकोळ कारण काढुन रागाने द्वेषाने सामनेवाले यांचेबरोबर भांडणतंटा करीत व घरातील कामधंदा न करता सलग तीन–चार दिवस झोपुन रहात. अर्जदाराचे वागण्यात बदल व्हावा म्हणुन सामनेवाला यांनी अर्जदाराची अनेक प्रकारे समजुत घालण्याचा प्रयत्न केला तरी देखील तिच्या स्वभावात बदल झाला नाही.

**०७.** अर्जदारास गौतमी व भुमी अशा दोन मुली होवून देखील अर्जदार हीचे सामनेवाला १ बरोबर संसारात कधीही मन रमले नाही. लग्न झाल्यापासुन अर्जदार ही सामेनवाला यास 'तु पती म्हणुन मला कधीही पसंत नव्हता व नाही' 'तुम्ही मला

फारकत देवुन मोकळे करा' असे बोलुन दाखवत. सामनेवाला नं.१ अर्जदारास फारकत देत नसल्यामुळे ती सामनेवाला नं.१ याचे मर्जी विरुध्द वागत.

०८. सामनेवाला नं. १ याच्या आईचे म्हणजे सामनेवाला नं.३ हिस माउली हॉस्पीटल संगमनेर येथे अॅडमीट केल्यानंतर अर्जदार हिने तिच्या वडीलांना फोन करुन मोठ मोठयाने रडुन 'माझे दुखत आहे, मला दवाखान्यात नेले नाही व सामनेवाला नं.१ याने स्वतःच्या आईस लगेच दवाखान्यात नेवुन अॅडमीट केले' असे सांगितले. सामनेवाला हा त्याच्या आईला अॅडमीट करुन दोन तासने घरी परत आला व अर्जदाराला दवाखान्यात येण्यासाठी विनंती केली परंतु अर्जदार दवाखान्यात जाण्यास तयार झाली नाही. अर्जदार बाहेर फिरायला जाताना सामनेवाला सोबत विचार विनीमय न करता विना परवानगीने बाहेर फिरायला अगर माहेरी जात असे. अर्जदार ही हरेगाव येथील मतमाउली यात्रेस एकटीच सामनेवाले १ याच्या इच्छे विरुध्द सायंकाळी पाच वाजता जावुन रात्रभर जत्रेत फिरुन दुस–या दिवशी सकाळी सहा वाजता घरी परत आली.

०९. अर्जदार लग्नानंतर अनेकवेळा सामनेवाल्या बरोबर भांडण करुन माहेरी गेली. फत्याबादचे पोलीस पाटील चंद्रभान ओहोळ हे अर्जदार हिच्या नांदत्या घरी येवुन गेले असता अर्जदाराने ऐकुन घेतले. अर्जदार हिच्या वडीलांना सामनेवाला नं.१ यांनी झालेले घटनाप्रसंग सांगितले असता अर्जदाराचे वडीलांना सामनेवाला नं.१ यांना समजुन वागण्याचा सल्ला देवुन अर्जदार रागीट तापट स्वभावाची असल्याचे सांगुन सामनेवाल्यास दम दिली की, 'तुम्हाला पाहुन घेईन' तसेच अर्जदाराच्या आईने सामनेवालेचा अपमान केला.

१०. सामनेवाला यांनी विवाहापुर्वी अर्जदाराचे वडीलांना सामनेवाला यांची आर्थिक परिस्थीती गरीबीची असल्याचे व सामनेवाला नं.१ यांचा मोठा भाउ व्यसनी असल्याने त्यांच्या मुलींचा सांभाळ करायचा आहे असे सांगितले होते. परंतु अर्जदाराने सामनेवाला नं.१ यांच्या भाउजयीला व त्यांच्या पुतण्यांना जाणुनबुजुन

त्रास दिला.

**११.** अर्जदाराच्या दुस–या बाळंतपणी अर्जदाराची सामनेवाला नं. १ ने मुलीप्रमाणे काळजी घेतली. सामनेवाला नं. १ याचे कपडयाचे दुकान होते. अर्जदाराच्या त्रासास वैतागुन त्याला दुकान बंद करावे लागल्याने त्यास मोठा तोटा झाल्याने तो कर्ज बाजारी झाला. सामनेवाला नं.१ व त्याची मधली भाउजय यांच्या मध्ये अनैतिक संबंध असल्याचे घाणेरडे खोटे आरोप करुन अर्जदार हि सामनेवाला नं.१ यास बदनाम करुन त्रास देत.

**१२.** अर्जदार एक दिवस घरी पाहुणे आले असता त्यांच्या समोर भांडणतंटा करुन कपाटातील दागीने व पैसा अडका घेवून माहेरी न सांगता निघुन गेली व परत नांदण्यास आली नाही. अर्जदाराने सामनेवाला नं.१ याचा स्वतःहुन त्याग केलेला आहे. सामनेवाला याने अर्जदारास नांदण्यास येण्यासाठी वकीलांमार्फत नोटीस पाठविली त्या नोटीसला अर्जदाराने खोटे उत्तर देवुन सामनेवाला नं१ याचे विरुध्द खोटे आरोप केले.

**१३.** सामनेवाला नं.१ हे दोन्ही मुलींचा सांभाळ करत असल्याचे व लहान मुलीला मेंदुचा त्रास असुन सामनेवाला याला तिचा औषधपाण्याचा खर्च होत असल्याचे त्याने कथन केले. अर्जदार हिने सामनेवाला यांच्या विरुध्द दिनांक २५.१०.२०२४ रोजी लोणी पोलीस स्टेशनला खोटी तक्रार दिल्याचे सांगितले आहे. सामनेवाले १ ते ५ यांनी कधीही अर्जदाराकडे शेती औजारे खरेदी करण्यासाठी पैशाची मागणी करुन त्रास दिलेला नाही. केवळ सामनेवाले यांचे विरुध्द भा.द.वी कलम ४९८ अन्वये कारवाई करता यावी व त्यांना खोटया गुन्हा गोवता यावे यासाठी सामनेवाले यांचे विरुध्द अर्जदाराने लोणी पोलिसस्टेशनला खोटी फिर्याद दाखल केली आहे. अर्जदार हिस सामनेवाले नं.१ सोबत नांदण्याची सुरुवातीपासुन इच्छा नव्हती त्यामुळे तीने सामनेवाला विरुध्द खोटे आरोप केले.

**१४.** सामनेवाला नं१ यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन तो मोलमजुरीने मिळेल तो कामधंदा करतो. तसेच सामनेवाला नं २ व ३ याचे वय झालेले असुन त्यांना कोणताही कामधंदा नाही व उत्पन्नाचे साधन नाही. त्यांचे पालन पोषण व औषधपाण्याचा खर्च सामनेवाला नं.१ करत असुन दोन्ही मुलींची पालनपोषणाची जबाबदारी देखील त्याच्यावर आहे.

**१५.** अर्जदार ही १२ वी शिकलेली असुन तिचे पार्लर व शिवणकाम यांचे कोर्ससेस झालेले असुन तिला १५ ते २० हजार रुपये महिना मिळतो. अर्जदार पती व दोन्ही मुलींना सोडुन माहेरी मौजमजेचे जिवन जगत आहे. सामनेवाला नं.१ यांची आर्थिक परिस्थीती हलाखीची असल्याकारणने ते अर्जदारास मागणी केल्याप्रमाणे स्वतंत्रपणे रुपये २५,०००/– दरमहा पोटगी देवु शकत नाही. अर्जदार अर्जदार कमवती असुन तिने स्वतःहुन सामनेवाला नं.१ याचा त्याग केलेला आहे. सामनेवाला नं. १ ते ५ यांनी अर्जदाराचा कोणताही कौटुंबीक हिंसाचार केलेला नाही. त्यामुळे तिला नुकसान भरपाईपोटी ५,००,०००/– मागण्याचा व लमसम पोटगी ७,००,०००/– कायदयाने हक्क अधीकार पोहचत नाही. अर्जदाराने स्त्रीधन वस्तु अशा प्रकारच्या कोणत्याही वस्तु अर्जदारास लग्नात दिलेल्या नसल्याने अर्जदारास मागता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार करुन प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**<u>विचाराधीन प्रश्ने ...</u>**

**१६.** अर्जदार व गैरअर्जदार यांची परस्पर विरोधी कथेन विचारात घेता खालीलप्रमाणे वादप्रश्न उपस्थिती होतात. त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत नोंदविण्यात आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अर्जदारास प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचाराचा सामना करावा लागला का ? | **होय..** |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार गैरअर्जदारसोबत राहत नसल्याचे प्रथमदर्शनी संयुक्तीक कारण आहे काय ? | **होय..** |
| ३. | अर्जदाराकडे स्वतःला साभांळण्यास प्रथमदर्शनी सक्षम आहे काय ? | **नाही.** |
| ४. | अर्जदार अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास काय दराने ? | **होय..** |
| ५. | आदेश ? | **अंशतः मंजुर करण्यात येत आहे.** |

**युक्तीवाद...**

**१७.** अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.आर.डी भोसले यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या विधीज्ञांनी अर्जातील कथनांची पुर्नरावृत्ती युक्तीवादात केली असुन अर्जदाराला योग्य ती पोटगी देण्याची विनंती केली आहे.

**१८.** सामनेवाल्याला वारंवार पुकारले असता गैरहजर. अभिलेखावर कोणताही अर्ज नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज सामनेवाल्यांच्या युक्तीवादाविना पुढे चालविण्यात येत आहे.

**कारणमिमांसा...**

**विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ५ बाबतः-**

**१९.** अर्जदार व सामनेवाल्यांच्या यांच्यातील नातेसंबंध सामनेवाल्याने आव्हानीत केलेले नाही, त्यामुळे अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह झालेला आहे याबद्दल दुमत नाही.

**२०.** अर्जदाराने सामनेवाल क्र.१ व त्याच्या घरच्यांनी विविध प्रकारे छळ केल्याचे कथन केलेले आहे. त्यात प्रामुख्याने पैशाची मागणी करणे, व पैशाची

मागणी पुर्ण न झाल्यामुळे मानसिक त्रास देणे, मारहाण, शिवीगाळ, शारिरीक त्रास, तसेच पालणपोषणाची जबाबदारी न घेणे इ. या बाबींवर भर दिलेला आहे. याउलट सामनेवाला क्र. १ ने अर्जदाराला संसारात रस नाही व तिला सामनेवाला क्र. १ आवडत नाही. त्यामुळे ती वैवाहिक जबाबदा–या व्यवस्थित पार पाडत नाही असे कथन केले आहे. या परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने अभिलेखावर अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्या कथनांशिवाय ईतर कोणतेही पृष्टीवर्धक बाब नाही. त्यामुळे या घडीला त्यांच्या कथनांविषयी विवेचन करणे किंवा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.

**२१.** अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, ते सामनेवाला क्र.१ सोबत राहत नाही. सामनेवाला क्र.१ च्या कथनांमधुन असा बोध होत आहे की, अर्जदार सामनेवाल्यांशी भांडण करुन माहेरी निघुन गेली. सामनेवाला क्र. १ ने अनेकवेळा प्रयत्न करुनही अर्जदार नांदण्यास आली नाही. अर्जदार ही सन २०२४ पासुन माहेरी रहात आहे. याउलट अर्जदाराने असे कथन केले आहे की, दिनांक १३.०२.२०२४ रोजी सामनेवाला यांनी अर्जदारास वैयक्तीक व संयुक्तीकरित्या मारहाण करुन, शिवीगाळ करुन एकावस्त्रानिशी घरातून हाकलून दिले. त्यानंतर अर्जदाराच्या घरच्यांनी बराच प्रयत्न केला असता, सामनेवाल्यांनी तिला परत नांदण्यास नेले नाही. कोणकोणाला कुठल्या परिस्थीतीत सोडुन गेले यावर सध्या भाष्य करणे या घडीला योग्य नाही. परंतु प्रथमदर्शनी हे समोर येत आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ सोबत राहत नाही. अर्जदार व सामनेवाला क्र.१ च्या कथनांमधुन एक गोष्ट समोर येत आहे ती म्हणजे अर्जदार व सामनेवाला क्र. १ च्या दोन्ही मुली या अर्जदार सोबत नाहीत. दोन्ही मुली अल्पवयीन आहेत. अर्जदार ही आई या नात्याने मुलींच्या पासुन यांच्या पासुन दुरावली आहेत. त्यामुळे अर्जदाराचे होत असणारे मानसिक खच्चीकरण व तळमळ यातुन स्पष्ट दिसत आहे. सामनेवाला क्र.१ यांनी पती व पिता म्हणुन मुलींना अर्जदाराच्या मातृत्व प्रेम व स्नेह मिळावे यासाठी कोणती पाऊले उचललेली आहेत या संदर्भात मौन बाळगलेले आहे. यातुन

अर्जदाराला झालेल्या भावनिक वेदनांचे अंदाज सुध्दा बांधता येणार नाही. अशा वेळेस अर्जदार ही आपल्या मुलीं पासुन लांब आहे, यातुन अर्जदार ही सामनेवाला क्र. १ सोबत रहात नसल्याचे प्रथमदर्शनी संयुक्तीक कारण समोर येत आहे. सबब, **विचाराधीन प्रश्न क्र. २** चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**२२.** अर्जदार माहेरी राहत असल्यावर सामनेवाला क्र.१ ने तिच्या भरण पोषणाची जबाबदारी घेतल्याचे त्यांच्या म्हणण्यातुन समोर येत नाही. अर्जदार या २८ वर्षाच्या महिला असुन त्यांनी त्यांच्या निशाणी १५ वर मालमत्ता व जबाबदारीच्या प्रतिज्ञापत्रात त्यांचे शिक्षण १२ वी पर्यंत झाल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे त्यांचे फारसे शिक्षण झालेले दिसत नाही. त्यामुळे त्या काम करुन पुरेसे उत्पन्न घेउन स्वतःचे उदरनिर्वाह व्यवस्थित व समाधानकारक करु शकतात याबददल साशंकता वाटत आहे. जरी अर्जदार काही काम करत असल्या तरी आजच्या धावत्या व स्पर्धात्मक जगात त्यांना काही विशेष कौशल्य व उच्च शिक्षण नसताना पुरेसे उत्पन्न मिळणे अवघड वाटत आहे. त्यामुळे अर्जदाराकडे स्वतःचे पालनपोषण करण्यासाठी उपयुक्त साधन नसल्याचे म्हणता येईल. असे असताना सामनेवाला क्र.१ यांनी पती म्हणुन अर्जदाराच्या पालनपोषणासाठी कोणती व कशी तरतुद केली या विषयी मौन बाळगले आहे. सामनेवाला क्र.१ ने अर्जदाराने अर्ज दाखल करण्यापुर्वी उदरनिर्वाहासाठी काही व्यवस्था केली किंवा अर्ज दाखल केल्यानंतर तशी व्यवस्था करण्याची कोणतीही तत्परता दर्शविली नाही. यावरुन अर्जदाराच्या उदरनिर्वाहासाठी सामनेवाला क्र.१ यांची उदासिनता दिसुन येत आहे. त्यामुळे अशा परिस्थीतीत अर्जदाराला स्वतःच्या पालनपोषणासाठी व उदनिर्वाहासाठी हात पसरविण्याची वेळ आली असल्यामुळे तिचे मानसिक खच्चीकरण होत असल्याचे म्हणता येईल. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदारा वर आर्थिक तसेच मानसिक अत्याचार झाल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार सध्या माहेरी राहत असुन अर्जदारामध्ये निर्माण झालेली असुरक्षितता व हतबलता स्पष्टपणे समोर येत आहे. सामनेवाला क्र.१ यांनी त्यांची पती म्हणुन जबाबदारी सुध्दा टाळलेली दिसुन

येत आहे.

२३. सामनेवाला क्र.१ हे बागायती शेती करत असुन ट्रॅक्टर व दुध व्यवसाय करत आहे असे अर्जदाराने कथन केलेले आहे. पण या संदर्भात अर्जदाराने ईतर कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. याउलट सामनेवाला क्र. १ ने ते मजुरी करत असल्याचे कथन केलेले आहे.

२४. सामनेवाला क्र.१ यांनी त्यांचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र निशाणी ११ वर दाखल केलेले आहे. त्यात ते ३३ वर्षाचे असल्याचे नमुद आहे. सामनेवाला क्र.१ हे निरोगी व शारिरीकदृष्टया सक्षम असल्याचे त्यांच्या कथनांमधुन समजून येत आहे. परंतु त्यांनी उत्पन्नबाबत कोणताही तपशील समोर आलेला नाही. सामनेवाला क्र. १ ला निशाणी ११ वरील मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रामध्ये हप्त्याने घेतलेले कर्ज व बुलेट व एकत्रीत कुटुंबातील कुटुंब व्यवस्था म्हणुन घेतलेला ट्रॅक्टर तसेच बजाज फायनान्स रक्कम रुपये ७०,०००/– कर्ज असे मालमत्ताच्या रकान्यात तपशील दिलेला आहे. सामनेवाला क्र. १ ने स्वतः नमुद केलेले आहे की त्यांचे आई वडील वयस्कर आहेत व त्यांना काही कामधंदा होत नाही. त्यामुळे सामनेवाला क्र. १ हे घराची सर्व जबाबदारी पहात आहेत. सामनेवाला क्र. १ कडे जरी कर्जाउ बुलेट असली तरी बुलेट ही गाडी सामान्य माणसाच्या खिशाला परवडण्यासारखी नाही. त्यामुळे सामनेवाला क्र. १ त्यांचे उत्पन्न संदर्भात निश्चीत माहिती न देता मोघम कथने करत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे योग्य ते साधन असुन त्यांचे उत्पन्न समाधानकारक असल्याचे म्हणता येईल. तरीही सामनेवाला क्र. १ ने अर्जदारांच्या भरण पोषणा संदर्भात कोणती पाउले उचलली याचा खुलासा केला नाही.

२५. तसेच सामनेवाला क्र. १ ने अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम असल्याचे त्यांच्या म्हणण्यामध्ये म्हंटले आहे. अर्जदार नर्सींग व शिवणकाम तसेच ब्युटीपार्लरच्या व्यवसायामध्ये महिन्याला १५ ते २०,०००/– रुपये

मिळवीते. परंतु  या संदर्भात सामनेवाला क्र. १ ने अभिलेखावर प्रथमदर्शनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. जरी अर्जदार  या काही काम करत असल्या तरी वर म्हटल्याप्रमाणे त्यांचे उच्च शिक्षण नसल्यामुळे व त्यांच्याकडे आताच्या घडीला कोणतेही विशेष कौशल्य नसल्यामुळे आज महागाईच्या जगात त्यांचे पुरेसे उत्पन्न येत असेल असे वाटत नाही. त्यामुळे **विचाराधीन प्रश्न क्र. ३ चे** उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**२६.** सामनेवाला क्र.१ हा जरी त्यांनी कथन केल्या प्रमाणे मजुरी करत असेल तरीही ते बुलेट गाडी घेवु शकतात, यावरुन सामनेवाला क्र.१ यांचे उत्पन्न अर्जदारांपेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत सामनेवाला क्र. १ ने अर्जदाराला आधार देणे अपेक्षित होते पण तसे काही घडले नाही. परंतु सामनेवाला क्र.१ प्रस्तुत प्रकरणात हजर राहून स्वारस्य दाखवत नाही.  तसेच  अर्जदाराच्या पालन पोषणासाठी सामनेवाला क्र. १ ने प्रकरण दाखल झाल्यानंतरही कोणतेही पाउले उचललेली नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१ अर्जदाराची जबाबदारी घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे पुन्हा एकदा निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे **विचाराधीन प्रश्न क्र. १ चे** उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**२७.** प्रस्तुत अर्जातील व सामनेवाला यांच्या कथनांविषयी निर्णय येण्यास थोडाफार अवधी लागणार आहे. तोपर्यंत अर्जदाराच्या पालनपोषणाची सोय सामनेवाला क्र.१ ने करणे आवश्यक आहे. सामनेवाला क्र. २ ते ४ यांच्या संदर्भात या घटकेला कोणतेही चर्चा करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१ वर अंतरिम पोटगीची जबाबदारी टाकण्यात येत आहे. त्यामुळे अशा परिस्थीतीत अर्जदाराला अंतरीम पोटगी देण्यात येत आहे. सबब, **विचाराधीन प्रश्न क्र. ४** चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**२८.** आता प्रश्न असा येतो की, अर्जदाराला किती अंतरीम पोटगी देण्यास यावे. अर्जदाराने तिच्या निशाणी १५ वरील मालमत्ता व जबाबदारीच्या प्रतिज्ञापत्रात

सामनेवाला क्र. १ शेती, ट्रॅक्टर व दुग्ध व्यवसाय करत असुन महिनाकाठी १,५०,०००/– रुपये मिळत असल्याचे कथन केलेले आहे. परंतु जरी सामनेवाला क्र. १ ने मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांच्याकडे असलेल्या बुलेटगाडी, ट्रॅक्टर या संदर्भात मोघम कथने घेतली असली तरी यातुन त्यांची आर्थिक परिस्थीती सुलभ असल्याचे दिसुन येत आहे तरीही त्यांचे निश्चीत उत्पन्नाचा अंदाज बांधता येणार नाही.

**२९.** अशा परिस्थीतीत सामनेवाला क्र. १ ने त्यांच्या कथनांमध्ये ते मजुरी करत असल्याचे म्हटले आहे. आता किमान वेतन कायदयामध्ये सुध्दा बदल झालेला असुन आता किमान वेतन दिवसा ४०० ते ५००/– रुपये मिळत आहे व एखादयाला काम करण्याची इच्छा असेल तर महिन्याच्या प्रत्येक दिवसाला काम मिळत आहे. पण तरीही जर ५ दिवस सुट्टयांचे धरले नाही, तरीही एखादा होतकरु व्यक्ती २२ ते २५ दिवस काम करुन महिना काठी १०,०००/– ते १५,०००/– रुपयांपर्यंत उत्पन्न मिळवू शकतो.

**३०.** सामनेवाला क्र. १ यांच्यावर त्यांच्या सामनेवाला क्र. २ व ३ त्यांची आई, वडील व दोन्ही मुलींची जबाबदारी आहे. अर्जदार क्र. १ ने मासिक २५,०००/– रुपयांची मागणी केलेली आहे. अर्जदाराने त्यांचे निशाणी क्र.१५ वर मालमत्ता व जबाबदारीच्या प्रतिज्ञापत्रात खर्चासंदर्भात विवरण दिलेले नाही. पण अर्जदाराचे अन्न, वस्त्र, निवारा व औषधे, त्याचबरोबर योग्य ते जीवन जगण्यासाठी अर्जदारांस दरमहा प्रत्येकी २५००/– रुपये पोटगी सामनेवाला क्र.१ ने देणे न्यायोचित होईल.

**३१.** आता प्रश्न असा आहे की, अंतरीम पोटगी आदेश झाल्याच्या दिनांकापासुन देण्यात यावे किंवा मुळ अर्ज दाखल झाल्यापासुन देण्यात यावे. प्रस्तुत प्रकरण सन २०२४ साली दाखल झालेले आहे. सामनेवाला क्र.१ ने जवळ जवळ दोन वर्ष अर्जदारांच्या जबाबदारी घेण्याबद्दल उत्सुकता दाखविलेली नाही. यातुन हे

लक्षात येत आहे की, सामनेवाला क्र. १ अर्जदारांविषयी दुर्लक्षित भावनेने व्यवहार करत होते. त्यामुळे एकुण रुपये २५००/– अंतरीम प्रतिमाह पोटगी ही मुळ अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदारांना देणे न्यायोचित होणार आहे.

३२. वरील सर्व विवेचनातुन अर्जदार अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र असुन,सामनेवाला क्र.१ ने अर्जदारांस दरमहा २५००/– रुपये अंतरीम पोटगी देण्याचे निष्कर्ष निघत असल्यामुळे **विचाराधीन प्रश्न क्र. ५** च्या उत्तरदाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १ | अर्ज अंशतःमंजुर करण्यात येत आहे. |
| २ | सामनेवाला क्र.१ ने अर्जदारांस दरमहा २५००/– रुपये (दोन हजार पाचशे रुपये) अंतरीम पोटगी म्हणून मुळ अर्ज दाखल तारखेपासुन दयावे. |
| ३. | सदर आदेशाची प्रत अर्जदारांना देण्यात यावी. |
| ४. | सदर आदेशा संदर्भात माहिती संबंधीत संरक्षण अधिकारी यांना सुध्दा दयावी. |

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2026.06.15 15:12:10 +0530

(काटकर विजया एन.एस.)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.४)श्रीरामपूर.

श्रीरामपूर
दिनांक–१५.०६.२०२६